**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**

बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम २००५ च्या कलम १७ व १८, १९ व अधिनियम २००६ च्या नियम ३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगावर अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी राज्यातून नामांकने मागविण्यात येत आहेत.

- **अध्यक्ष: एकूण १ पद:- प्रतिष्ठित व्यक्ती व बालकांच्या कल्याण व विकासाशी निगडीत अतिउत्कृष्ठ कार्य करणारी व्यक्ती असावी.**
- **सदस्य: एकूण पदे - ६ : (यापैंकी किमान २ महिला)**

वरील पदासाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत;

१. सदरची व्यक्ती खालील क्षेत्रातील प्रतिष्ठीत, कार्यक्षम, सचोटी व खालील विषयांमधील अनुभवी असणे अनिवार्य आहे.
- ❖ **शिक्षण**
- ❖ **बालकांचे आरोग्य, काळजी, कल्याण किंवा विकास**
- ❖ **बालन्याय क्षेत्रातील किंवा दुर्लक्षित, उपेक्षित मुले यांची काळजी किंवा अपंग मुलांचे क्षेत्र.**
- ❖ **बाल कामगार प्रथा निमूर्लनाचे क्षेत्र किंवा त्रासात असलेल्या बालकांबाबत**
- ❖ **बाल मानसशास्त्र किंवा समाजशास्त्र आणि**
- ❖ **बालकांच्या कायद्याविषयीचे क्षेत्र**

२. अध्यक्ष/सदस्य पदाकरीता नामर्निदेशित करावयाच्या उमेदवार यांचे वर भुतकाळामध्ये मानवी हक्क किंवा बाल हक्क उल्लंघनाच्या नोंदी आढळल्यास सदर उमेदवार नियुक्तीस पात्र राहणार नाही.

३. दोन वेळा अध्यक्ष/ सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेली व्यक्ती पुन्हा नामनिर्देशनासाठी पात्र रहाणार नाही.

४. अध्यक्ष/सदस्य यांचा नियुक्ती कालावधी ३ वर्षाकरीता राहील तथापि अध्यक्ष हे वय वर्षे ६५ नंतर अध्यक्ष पद धारण करु शकणार नाही तसेच सदस्य हे वय वर्षे ६० नंतर सदस्य हे पद धारण करु शकणार नाही.

उमेदवारांनी नामांकन सादर करतेवेळी पुढील कागदपत्रे सादर करावीत.
- ❖ **विहित नमुन्यातील अर्ज**
- ❖ **उमेदवाराची सविस्तर माहिती**
- ❖ **मानवी हक्क किंवा बाल हक्कांचे उल्लंघन केले नसल्याचे पोलीस विभागाचे चारित्र्य प्रमाणपत्र.**
- ❖ **उमेदवार सदयस्थितमध्ये कार्यरत असलेल्या पदाचा व कार्यलयाचा संपुर्ण तपशिल.**
- ❖ **उपरोक्त नमुद क्षेत्रातील कामाचा अहवाल (पुराव्यासह)**

शासन निर्णय क्र.बाहआ-२००८/प्र.क्र.१७/का.९ दिनांक १.८.२०१६ अन्वये बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचे मानधन व इतर सेवासुविधा देण्यात येतील. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संकेतांक क्र.२०१६०८११६४९४२०२३० असा आहे.

वर नमुद केलेल्या पदांसाठी दिलेल्या अटींची पुर्तता करणा-या इच्छूक व्यक्तींनी आपले खालील विहित नमुन्यातील अर्ज वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि इतर तत्सम कागदपत्रासह जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, २८- राणीचा बाग,जुन्या सर्किट हाऊस जवळ, महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांच्या कार्यालयात सादर करावे.

तसेच सदरची जाहिरात शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**आयुक्त**
**महिला व बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे करीता.**

**महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगातील अध्यक्ष व सदस्य पदावर नामनिर्देशन करण्यासाठी अर्ज.**

---

पासपोर्ट आकाराचा फोटो

१. नाव :

२. जन्मतारीख (वय):

३. संपूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक/ मोबाईल क्रमांक/ई-मेल आय डी :

४. कोणत्या पदासाठी अर्ज करण्यात येत आहे (अध्यक्ष/सदस्य):

५. शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | वर्ष | विद्यापीठाचे नाव | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

६. उमेदवाराची सविस्तर माहिती:

७. खालील क्षेत्रातील बालकांसोबत काम करण्याचा अनुभव:

| अ.क्र | **अनुभव:**<br>• बालकांच्या कल्याण व विकासाशी निगडीत अतिउत्कृष्ठ कार्य<br>• शिक्षण<br>• बालकांचे आरोग्य, काळजी, कल्याण किंवा विकास<br>• बालन्याय क्षेत्रातील किंवा दुर्लक्षित, उपेक्षित मुलींची काळजी किंवा अपंग मुलांचे क्षेत्र.<br>• बाल कामगार प्रथा निमूर्लनाचे क्षेत्र किंवा त्रासात असलेल्या बालकांबाबत<br>• बाल मानसशास्त्र किंवा समाजशास्त्र<br>• बालकांच्या कायद्याविषयीचे क्षेत्र | कार्यालयाचे नाव | यंत्रणेचे नाव | पदाचे नाव | थोडक्यात कार्य | कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|

८. नोकरी/व्यवसायाबाबत तपशील कार्यालयाचा पत्ता व दुरध्वनी क्रमांक:

९. मानवी हक्क किंवा बाल हक्कांचे उल्लंघन केले नसल्याचे पोलीस विभागाचे चारित्र्य प्रमाणपत्र जोडले आहे का?

१०. उल्लेखनिय कार्य केले असल्यास त्याचा तपशील

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी संपूर्ण नांव व पत्ता)